भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑

TREASURY OFFICE NASIK
BP 312510
15 JUL 2022
STPHC ATO

अ.नु.क्र. ५१६५ दि. २९/७/२०२२ रु. ५०० वेको
साक्षीदार कोणाकडे सादर करावयाचे विक्री-परीक्षणासाठी कारण ---
मुद्राक घेणाऱ्याचे नांव : सुप्रिया भिकसाहेब मोरे
दस्ताचा प्रकार ---- दस्त नोंदणी करणार का-होय/नाही
दु.निबंधक कार्यालय-नाशिक / इतर ---- पोबदला रक्कम
दुसऱ्या पक्षकाराचे नांव: ----
मिळकत वर्णन : ----
हस्ते : सुप्रिया मोरे
नही ----

आर. डी. स्टॅम्प वेंडर
कोर्ट आवार, नाशिकरोड
लायसन्स नं. २२, ९०

NOTARY
NOTED & REGISTERED
at Serial 1461/2022
DATE 29/7/2022
THIS DOCUMENT
Contains 07 Pages

:: लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा ::

लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा आज दिनांक ३० माहे जुलै

इसवी सन २०२२ रोज शुक्रवार वार ते दिवशी नाशिक मुक्कामी .....

GOVT. OF INDIA NOTARIAL NOTARY

१) श्री. जसबीरसिंग अमरिकसिंग आनंद,

उ.व. ६९ वर्ष, धंदा – व्यापार,

पॅन नं.

२) सौ. सुमितकौर रणजितसिंग आनंद, लिहून

उ.व. ५५ वर्ष, धंदा – व्यापार, घेणार

पॅन नं.

दोघेही रा. आनंद निवास,

नाशिकरोड, नाशिक

यांसी .....

सुखदेव महिपत मोरे (पाटील) प्रतिष्ठान

तर्फे अध्यक्ष

सौ. सुप्रिया भाऊसाहेब मोरे, लिहून

उ.व. ५९ वर्ष, धंदा – व्यापार, देणार

पॅन नं.

रा. पंडीत कॉलनी, गंगापुर रोड,

नाशिक

कारणे लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा लिहून घेतात ऐसा जे की,

१) मिळकतीचे वर्णन : तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी व तालुका, नाशिक, नाशिक महानगरपालिका हददीतील **नाशिक** शिवारातील रे. सर्व्हे नं. **४२२ब/४** यांसी फायनल प्लॉट नंत्र. **२५५** एकूण क्षेत्र **२४८५.१० चौ. मी.** यांसी बिनशेती आकार **रुपये ३२८०.२० पैसे,** यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे :–

पुर्वेस	:	फायनल प्लॉट नं. २५४
पश्चिमेस	:	४२२ ब / ३
दक्षिणेस	:	मार्जिनल रोड जागा व पुढे आग्रा रोड
उत्तरेस	:	सर्व्हे नं. ४२२ ब/२

येणेप्रमाणे मिळकतीवरील बांधकाम केलेल्या इमारतीतील पहिल्या व दुस–या मजल्यावरील बांधीव क्षेत्र **७९९६** चौ. फुट ही बांधीव मिळकत व खालील संपुर्ण खुली जागा.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही लिहून घेणार यांची स्वतःची मालकीची असून प्रस्तुत मिळकतीवर आजपर्यंत निर्वेध असा कबजा व वहीवाट ही लिहून घेणार यांचीच होती. लिहून घेणार हे प्रस्तुत मिळकतीचे कायदेशीर मालक असुन सदर मिळकत कलम १ मधील बांधीव जागा व त्याखालील खुली जागा लिहून घेणार यांना परवाना पत्र दस्तानुसार तसेच कराराने देण्याचा संपुर्ण अधिकार लिहून घेणार यांना आहे. त्या अधिकारानुसार लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना यापुर्वी म्हणजे दिनांक ५ माहे फेब्रूवारी २०१० रोजी लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा लिहून व नोंदवून दिलेला असून सदर मिळकत लिहून देणार यांना वापर करण्यास परवानगी दिलेली आहे.

३) सदर दस्तांमध्ये लिहून घेणार हे कलम 1 मधील बांधीव जागा व त्याखालील खुली जागा म्हणजेच वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे मालक असून लायसेन्सॉर म्हणुन आहेत व त्यांना "**तुम्ही**" असा शब्दप्रयोग वापरलेला आहे व लिहून देणार हे सदर करारनाम्यात लायसेन्सी म्हणुन आहेत व त्यांना "**आम्ही**" असा शब्दप्रयोग वापरलेला आहे.

४) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही तुमचे मालकीची व कबजाची तसेच वहीवाटीची असुन त्यासंबंधी आम्ही तुम्हाला परवाना तत्वावर सदर कलम १ मधील बांधीव जागा व त्याखालील खुली जागा तुम्हांस वापरणेस दिलेली असून त्या करारनाम्याचे पुढील कालावधीसाठी नुतनीकरण करणेचा प्रस्ताव मांडला व विनंती केली. सदर विनंती तुम्ही मान्य करुन प्रस्तुत कलम १ मधील बांधीव जागा व त्याखालील खुली जागा आज पासून पुढील ६० महिने मुदतीने वापरण्यासाठी तुम्ही आमचे ताब्यात मालकी हक्काने कबजा तुमचेकडे ठेवून परवाना फक्त वापरण्यास दिली. तुमचे व आमचे मध्ये परवानापत्र करार तत्वानुसार ज्या अटी व शर्ती ठरल्या त्याची यादी पुढील प्रमाणे :

१. आम्ही परवाना म्हणुन वर कलम 1 मध्ये वर्णन केलेली मिळकत ही दिनांक ०१/०२/२०२० पासून परवाना म्हणुन व लायसेन्सवर घेतलेली असून सदर मुदत ही दिनांक ३१/०१/२०२५ रोजी संपणार आहे. त्यानंतर मुदतवाढ मागणेचा लायसेन्सी म्हणुन आम्हाला कोणताही अधिकार राहणार नाही. सदरची मुदत 5 वर्षाची असून इंग्रजही ग्रेगोरियन पध्दतीप्रमाणे धरलेली आहे.

२) आम्ही वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही परवाना तत्वावर वापरणार आहे व त्या जागेमध्ये आम्ही शैक्षणिक संस्था चालवित असून ती यापुढेही चालविणार आहे.

३) प्रस्तुत जागा ही व्यापारी तत्वावर म्हणजेच कमर्शियल उपयोगासाठी आम्ही वापर करीत असल्यामुळे सदर जागेबाबतचा महानगरपालिकेचा जो अधिकृत तसेच वाढीव टॅक्स / घरपटटी येतो तो आम्ही भरत असून तो यापुढेही मुदत संपणेपर्यंत भरणार आहोत.

४) प्रस्तुत मिळकतीमध्ये जो लाईट बील येईल तो आम्ही भरत असून तो यापुढेही मुदत संपणेपर्यंत भरणार आहोत.

५) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीची जागा वापराची परवाना फी ही दर महिन्याप्रमाणे आकारली जाईल व सदर परवाना फी ही दिवसांचा सारासार विचार न करता इंग्रजी कॅलेंडरच्या वर्षाप्रमाणे राहील व सदर लायसेन्स फी दर महिन्याला **रुपये ११०००/– (अक्षरी रक्कम रुपये अकरा हजार मात्र)** ठरलेली आहे व ती यापुढेही कायम राहील.

६) प्रस्तुत जागेमध्ये परवाना पत्र/करारपत्राच्या तत्वानुसार आम्हांला आमचे धंदा – व्यवसायासंदर्भात जे लायसेन्स अगर कायदेशीर परवाने काढावयाचे असतील ते आम्ही प्रस्तुत दस्ताच्या मुदतीपर्यंतच काढु व त्यानंतर कोणतेही मुदतीची सबब आम्ही सांगणार नाही. तसेच शैक्षणिक संस्थेसाठी आम्हांस कोणत्याही प्रकारचे कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घ्यावयाचे असल्यास त्यास तुम्ही कोणतीही हरकत राहणार नाही. मरात्र

सदर कर्ज फेडण्याची जबाबदारी आमची राहील.

७) प्रस्तुत परवाना पत्र /कराराची मुदत दिनांक ३१/०१/२०२५ रोजी संपणार आहे. सदरहू मुदत संपल्यानंतर म्हणजेच ३१/०१/२०२५ रोजी आम्ही आमचे शैक्षणिक संस्थेचा वापर बंद करु. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा ताबा जशा परिस्थितीत घेतला होता त्याच परीस्थितीत तुम्हांला देवू. तुम्हांला सदर ताबा देतांना तुमचेपैकी कोणीही ताबा घेतल्यास आमची कोणतही हरकत राहणार नाही.

८) प्रस्तुत जागेमध्ये आम्ही कोणत्याही प्रकारे अवैध अगर बेकायदेशीर धंदे आम्ही करीत नाही व यापुढेही करणार नाही. तसेच सदर जागा उपकरारनाम्यान्वये आम्हांला कायदेशीरपणे देता येत नाही याची जाणिव आहे व ती आम्ही देणार नाही. त्याचप्रमाणे सदर मिळकतीचे बांधकामास कोणत्याही प्रकारे धक्का पोहोचेल असे कृत्य आम्ही करणार नाही.

९) बॉम्बे रेंट ॲक्ट खाली भाडेकरी म्हणुन आम्हांला प्रस्तुत जागेविषयी कोणताही हक्क प्राप्त झालेला नाही व होणार नाही व तसा हक्क आम्ही भविष्यात कधीही सांगणार नाही, अशी लेखी हमी देत आहोत. तुमचे व आमचेत लायसेन्सॉर व लायसेन्सी हाच संबंध राहील. सदर करारनामा लिज नाही तर लायसेन्सी करारनामा आहे याची आम्हांला जाणिव आहे व आमच्या अभिवचनावर व लेखी हमीवर व भरवशावर तुम्ही वर कलम १ मध्ये वर्णन केली जागा आमचे ताब्यात **"लायसेन्स/परवाना"** करारवर वापरावयास दिलेली

आहे. सदर मिळकतीमध्ये जागा वापरणेशिवाय आम्हाला कोणतेही हक्क अगर अधिकार राहणार नाही.

१०) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर मालकी हक्क व मालकी हक्काने कब्जा तुमचाच राहील. मात्र सदर कराराच्या मुदतीपर्यंत जागा वापरण्यापुरता ताबा आमचेकडे राहील ही अट आम्हांला मान्य व कबुल आहे.

११) वरील सर्व शर्ती हया आमचेवर पूर्णपणे बंधनकारक आहे. आम्ही सर्व शर्ती कसोशीने पाळू. कोणत्याही शर्तीचा भंग करणार नाही. तसा भंग आमचेकडून झाल्यास सदर परवानापत्र तुम्ही रद्द करावे.

१२) सदर परवाना व लायसेन्सची मुदत संपल्यावर लिहून देणार हे ट्रेसपासर म्हणुन समजले जातील व प्रस्तावित मिळकतीच्या कब्जावर लिहून घेणार यांची आमचे सामानासह असलेल्या "**रि–एंट्री**" गृहित धरली जाईल.

येणेप्रमाणे हा लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा आम्ही राजीखुशीने, स्वसंतोषाने, कोणत्याही दडपणाला अगर प्रलोभनाला बळी न पडता अस्सल प्रत आमचेकडे ठेवून त्याखाली दोन साक्षीदारासमक्ष

सहया केल्या आहेत.

हा लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा

नाशिक

दिनांक :- 30/07/22



सुखदेव महिपत मोरे (पाटील) प्रतिष्ठान
तर्फे अध्यक्ष सौ. सुप्रिया भाऊसाहेब मोरे,

लिहून देणार

१) श्री. जसबीरसिंग अमरिकसिंग आनंद

२) सौ. सुमितकौर रणजितसिंग आनंद

लिहून घेणार

साक्षीदार

१) _____ २) _____

B. M. Pawar

BEFORE ME

A. I. SHAIKH
Advocate & Notary Govt.of India
Motarwar Society, Jail Road
NASHIK